महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४२१,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
ईमेल - sd6.sesd-mh@gov.in

क्रमांक : संकीर्ण-२०२१/प्र.क्र. १५७/२१/एसडी-६ दिनांक : १०नोव्हेंबर, २०२१.

विभागीय शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे
पद - शिउसं / सहा. सं. / शिउनि / शा.स. / लेखाधिकारी / कक्ष
शाखेचे नांव - उमाशि / माध्य/ प्राथ / लेखा / आस्था
आवक क्रमांक - १४८१८
आवक दिनांक - ८/१२/२०२१

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)

401
4

विषय :- महिला उद्योजकता विकसित होण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयांतर्गत "महिला उद्योजकता क्लब" स्थापन करण्याबाबत.

संदर्भ :- सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अ.शा.पत्र क्र.कौविउ-२०२१/प्र.क्र.२९/उद्योजकता, दि.१८ फेब्रुवारी, २०२१.

उपरोल्लेखित विषयास अनुसरुन संदर्भाधीन अर्ध शासकीय पत्र सहपत्रासह सोबत जोडून पाठविण्यात येत असून कृपया त्याचे अवलोकन करावे.

२. महिला उद्योजकांना प्रोत्साहित करण्यासाठी व उद्योजकता क्षेत्रामध्ये महिलांचे प्रमाण वाढविण्यासाठी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागांतर्गत कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटींतर्गत दि.०४/०१/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये "महिला उद्योजकता कक्ष" स्थापन करण्यात आला आहे. सदरहू शासन निर्णयात महिला उद्योजकता कक्षातर्फे विद्यार्थीदशेतच महिलांमध्ये उद्योजकता विकसित होण्याच्यादृष्टीने विद्यापीठ/महाविद्यालय/कनिष्ठ महाविद्यालय इत्यादी ठिकाणी "महिला उद्योजकता कक्ष" स्थापन करण्याची तरतूद विहित करण्यात आली आहे. सदरहू कक्ष स्थापनेसंदर्भात त्याची रचना, कार्ये, उद्देश व उपक्रम बाबतची माहिती सोबत जोडण्यात आलेली आहे. उक्त शासन निर्णयात नमूद केल्यानुसार कनिष्ठ महाविद्यालयात "महिला उद्योजकता कक्ष"स्थापन करण्याबाबत शासन स्तरावरुन कनिष्ठ महाविद्यालयांना निदेश देण्याबाबत उपरोक्त अर्ध शासकीय पत्रान्वये विनंती करण्यात आलेली आहे.

३. सदरहू अर्धशासकीय पत्रान्वये दिलेल्या विनंतीस अनुसरुन कृपया कार्यवाही करावी.

आपला ,

दत्तात्रय छ. शिंदे
१०/११/२०२१

( द. छ. शिंदे )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सहपत्र : वरीलप्रमाणे

महाराष्ट्र शासन

९७८ / ५८-६ / २१/२/२०२१

अन्शु सिन्हा
सचिव

अ.शा.प.त्र. क्र कौविउ २०२१ /प्र क्र २९/उद्योजकता
कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक - १८ फेब्रुवारी, २०२१

विषय - महिला उद्योजकता विकसित होण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयांतर्गत "महिला उद्योजकता क्लब" स्थापन करण्याबाबत...

संदर्भ - कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०२०/प्र.क्र.०३/उद्योजकता दिनांक ०४/०१/२०२१

प्रिय, महोदया,

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागांतर्गत नाविन्यपूर्ण संकल्पांवर आधारित उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्यामध्ये "महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण स्टार्टअप धोरण, २०१८" ला दिनांक ५ फेब्रुवारी, २०१८ ला मान्यता देण्यात आली आहे. या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व राज्यातील नव उद्योजकांना व नाविन्यपूर्ण परिसंस्थेच्या अध्ययन आणि विकासासाठी "महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी" स्थापना करण्यात आली आहे. सदर धोरणातील प्रमुख उद्दीष्टये पुढीलप्रमाणे आहेत.

महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण स्टार्टअप धोरणतील मुख्य उद्दिष्टे :

१. महाराष्ट्रामध्ये नव उद्योजकांसाठी व्यावसायिक वातावरण निर्मिती करणे तसेच राज्यातील युवकांच्या नवकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करुन देणे.
२. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान देण्यासाठी आणि नवीन रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी स्टार्ट-अप्सना सक्षम करणे.
३. उद्योजक परिसंस्थेशी पूरक नियामक रचना सुलभ करणे तसेच पायाभूत सुविधांना चालना देऊन स्टार्टअप परिसंस्थेला विकसित करणे.

महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण स्टार्टअप धोरणाची उद्दीष्टये साध्य करण्यासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत राज्यातील सर्व घटकांकरिता स्टार्टअप व नाविन्यता क्षेत्राशी संबधित विविध योजना,उपक्रम व कार्यक्रम राबविले जातात. सदर धोरणांतर्गत Startup Week, Establishment of Incubators, Start Up and Innovation Yatra, Grand Challenge, Quality Testing & Certification, Intellectual Property Rights, Maharashtra Virtual Incubation Centre आणि "हिरकणी महाराष्ट्राची" यांसारख्या अनेक कार्यक्रमांची यशस्वीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. या कार्यक्रमांमुळे राज्यातील अनेक स्टार्टअप्सना उद्योजकतेशी निगडीत विविध प्रकारचे सहाय्य व मार्गदर्शन उपलब्ध होत आहे.

Pl. draft a letter to All dyds

अशा अनेक कार्यक्रमाच्या विविध उपक्रम व यशस्वीतेमुळे नीती आयोगातर्फे जाहीर करण्यात आलेल्या इनोव्हेशन इंडेक्स मध्ये महाराष्ट्र राज्याचा "द्वितीय क्रमांक" आलेला आहे.

आता महिला उद्योजकांना प्रोत्साहित करण्यासाठी व उद्योजकता क्षेत्रामध्ये महिलांचे प्रमाण वाढविण्यासाठी कौशल्य विकस, रोजगार व उद्योजकता विभागांतर्गत कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटींतर्गत दिनांक ०४/०१/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये"**महिला उद्योजकता कक्ष"** स्थापन केला आहे. सदर शासन निर्णयातील अ.क्र.५ येथे महिला उद्योजकता कक्षातर्फे विद्यार्थीदशेतच महिलांमध्ये उद्योजकता विकसित होण्यासाठी विद्यापीठ/महाविद्याल/कनिष्ठ महाविद्यालय इत्यादी ठिकाणी महिला उद्योजकता क्लब स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे. सदर क्लबची रचना, कार्ये, उद्देश्य, उपक्रम इ. बाबतची माहिती सोबत जोडण्यात आहे.

उपरोक्तप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयात "उद्योजकता क्लब" स्थापन झाल्यास विद्यार्थिनींना स्टार्टअप, इनोव्हेशन, इनक्यूबेटर, आर्थिक मार्गदर्शन, तांत्रिक मार्गदर्शन आदीचा लाभ मिळू शकेल. महिला उद्योजकतेस प्रोत्साहन देण्यासाठी महिलांकरीता "सर नाथिबाई दामोदर ठाकरसी" (SNDT Women's University) येथे स्वतंत्र इनक्यूबेटर स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

उपरोक्त बाबींस अनुसरुन आपणास विनंती करण्यात येत आहे की, कृपया उपरोक्त विषयाच्या — आपणांशी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने, राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये "उद्योजकता क्लब" स्थापित व्हावेत, याकरीता आपल्या स्तरावरुन सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना सूचित करण्यात यावे, ही विनंती. (सोबत: शासन निर्णय दिनांक ०४/०१/२०२१, उद्योजकता क्लबची रचना- उपक्रम बाबतची टिपणी कार्ये, उद्देश्य)

आपली,

18.2.2021

(अन्शु सिन्हा)

प्रति,
श्रीमती वंदना कृष्णा
अतिरिक्त मुख्य सचिव,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय, मुंबई

# महिला उद्योजकता क्लब

महिला उद्योजकता क्लब हे महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये विद्यार्थीनींसाठी उद्योजकता कौशल्याचे विकसण करणे, उद्योजकीय परिसंस्थेशी समन्वय करणे, उद्योजकांचे मार्गदर्शन घेणे तसेच व्यवसाय कल्पनांचे सादरीकरण करणे यासाठी विद्यार्थीनींद्वारे चालविणारे एक व्यासपीठ असेल. हे क्लब महाविद्यालये आणि विद्यापीठांमधील तरुणींमध्ये उद्योजकतेविषयी प्रेरणा निर्माण करतील, विद्यार्थीनींसाठी स्टार्ट अप आणि व्हेंचर कॅपिटल क्षेत्रातील तज्ञांतर्फे मार्गदर्शक सत्र आयोजित करेल तसेच महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थीनींना स्टार्टअप स्पर्धामध्ये सहभाग आणि सहाय्य पुरवतील. हे क्लब नाविन्यपूर्ण परिसंस्था आणि पदवीधर तसेच माजी विद्यार्थ्यांना यांच्या मार्फत आवश्यक कौशल्य व संसाधने प्रदान करून नावीन्यपूर्ण उद्योजक बनण्यास मदत करेल. या क्लबद्वारे राबविण्यात येणाऱ्या काही उपक्रमांची माहिती खालीलप्रमाणे आहे :

**उद्दीष्ट १: विद्यार्थीनींसाठी विद्यार्थीनी-व्यवस्थापित आणि प्राध्यापकांचे मार्गदर्शनाने उद्योजकता क्लब तयार करणे**

- **क्लबची कार्यसूची आणि आराखडा / रचना तयार करणे** - विद्यार्थी आणि प्राध्यापक या दोन्ही प्रतिनिधींसह क्लबची रचना, भूमिका आणि जबाबदाऱ्या परिभाषित करणे तसेच क्लबच्या कामकाजाचा कालावधी व अटी व शर्ती यांचे वर्णन करने.
- **महिला उद्योजकता क्लबच्या सदस्यांची निवड** - स्पर्धात्मक अर्ज प्रक्रियेद्वारे विद्यार्थीनींना महिला उद्योजकता क्लबमध्ये सदस्यांची निवड करावी. क्लब सदस्य म्हणून का निवड केली जावी या बाबतच्या उत्तरचा विचार करावा.

**उद्दीष्ट २ - उद्योजकता आणि स्टार्ट-अप परिसंस्थेचे शिक्षण व्यासपीठ**

- **उद्योजकता कट्टा** - उद्योजकता, स्टार्टअप्स आणि नाविन्यपूर्ण मूलभूत संकल्पना शिकण्यासाठी आणि उद्योजकतेबाबत विविध अभ्यासक्रम उपक्रम आणि कार्यक्रमांची माहिती देण्यासाठी क्लबच्या सर्व सदस्यांनी साप्ताहिक / पंधरवड्याने भेटणे.
- **मार्गदर्शक वक्त्यांची मालिका** - या क्लबमध्ये विविध क्षेत्रांतील महिला उद्योजक, महाविद्यालय / विद्यापीठाच्या प्रख्यात माजी विद्यार्थी, स्टार्ट-अप, गुंतवणूकदार,

इनक्यूबेटर यांना पंधरवडा / साप्ताहिक वक्त्यांच्या मार्गदर्शक सत्रांचे आयोजन करण्यात यावे. विविध स्टार्ट-अप्स परिसंस्थेतील ऑनलाईन आणि ऑफलाइन कार्यक्रमांबाबत माहिती देण्यात यावी. महिलांना वास्तविक जीवनाच्या अनुभवातून उद्योजकता समजायला प्रोत्साहन मिळेल.

उद्दीष्ट ३ - "करून-शिकणे" उद्योजकता वातावरण तयार करणे

- **कल्पनांचे सादरीकरण / हॅकेथॉन** - क्लब कल्पनांच्या सादरीकरणाच्या स्पर्धा आयोजित करू शकतो ज्यात सहभागींना त्यांच्या स्टार्ट-अप कल्पनां संक्षिप्त स्वरूपात सदर करून, सदर कल्पनेवर काम करू इच्छिणाऱ्या विद्यार्थिनी संवाद साधून संघ बनवू शकतात. संघाना एकत्रित विचारकरण्यासाठी एक तास तयारीची वेळ दिली जाऊ शकते; उत्कृष्ट कल्पना निवडण्यासाठी ३ मिनिट सादरीकरण सत्र आयोजित केले जाऊ शकेल.
- **व्यवसाय आव्हान स्पर्धा** - वेगवेगळ्या संघांना त्यांच्या कल्पनांचे उत्पादन / तंत्रज्ञान / सेवा, बाजारपेठ, प्रतिस्पर्धी या मुद्यांवर सादरीकरण करण्यासाठी एक महाविद्यालयीन स्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात येऊ शकेल. सहभागींना प्रोत्साहन देण्यासाठी रोख पुरस्कार जाहीर केला जाऊ शकतो. विजेत्यांचे परिक्षण करण्यासाठी आणि त्यांची निवड करण्यासाठी परीक्षकांना आमंत्रित केले जाऊ शकते.

उद्दीष्ट ४ - परिसंस्थेतील नामांकित घटकांसोबत नेटवर्किंग

- **मार्गदर्शक कार्यक्रम** - सर्वोत्कृष्ट गटांना व्यवसायाची कल्पना वाढविण्यासाठी आणि किमान व्यवहार्य उत्पादन (MVP) तयार करण्यासाठी मार्गदर्शक (उद्योजक / गुंतवणूकदार / उद्योग व्यावसायिक) सोबत जोडून देणे.
- **उद्योजक , स्टार्टअप आणि गुंतवणूकदार यांच्यासोबत नेटवर्किंग** - स्थानिक उद्योजकांमधील क्लबच्या सदस्यांचे जाळे विस्तृत करण्यासाठी परिसंस्थेतील भागधारकांसह तिमाही नेटवर्किंग बैठक आयोजित करणे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संपर्क व्यवस्थेचा विस्तार करण्यासाठी आणि जागतिक व्यासपीठ विकसित करण्यासाठी TiE महिला ग्लोबल सारख्या जागतिक नेटवर्कशी सोबत भागीदारी केली जाऊ शकते.

महिला उद्योजकता कक्ष
महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी/समिती अंतर्गत "महिला उद्योजकता कक्ष" स्थापन करणे बाबत.

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग
शासन निर्णय क्रमांक:- कौविउ-२०२०/प्र.क्र.०३/उद्योजकता
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ०४ जानेवारी, २०२१

संदर्भ :- १) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, क्र. कोविआ-२०१६/प्र.क्र.७७/अभियान-१, दि.३ जुलै,२०१७.
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी यांचे जा.क्र.MSInnoS/ २०१९-२०/C.R.११७/INS/२६३, दि.१४ डिसेंबर,२०२० चे पत्र.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासनाने कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या अंतर्गत फेब्रुवारी, २०१८ मध्ये "महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण स्टार्टअप धोरण-२०१८" जाहीर केले. या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि राज्यातील स्टार्टअप व नाविन्यता परिसंस्थेच्या अध्ययन आणि विकसनासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीची स्थापना संदर्भाधिन क्र.१, दिनांक ३ जुलै, २०१७ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आलेली आहे. या सोसायटीतर्फे राज्यातील सर्व घटकांकरिता स्टार्टअप व नाविन्यता क्षेत्राशी संबधित विविध योजना व उपक्रम राबविले जातात. या उपक्रमांपैकी काही विशेष उपक्रम म्हणजे,

**महाराष्ट्र स्टार्टअप सप्ताह** - स्टार्टअप्सना शासनासोबत काम करण्याची संधी देण्यासाठी दरवर्षी स्टार्टअप सप्ताहचे आयोजन करण्यात येते. विजेत्या स्टार्टअप्सना नाविन्यता सोसायटीकडून प्रत्येकी रुपये १५ लाखांचे कार्यादेश दिले जातात.

**महाराष्ट्र स्टार्टअप आणि इनोवेशन यात्रा** - नवोदित उद्योजकांना त्यांच्या कल्पनांना व स्वप्नांना साकार करण्यासाठी व्यासपीठ प्रदान करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी या यात्रेचे आयोजन करते. सर्व वयोगटातील नागरिकांना यात सहभागी होण्याची संधी असते. विजेत्यांना प्री- इनक्यूबेशन, इनक्युबेशन सहाय्य, विशेष अर्थ सहाय्य इ. सुविधा पुरवण्यात येतात.

**बौद्धिक संपदा हक्क / गुणवत्ता परीक्षण आणि आर्थिक सहाय्य योजना** - प्रारंभिक टप्प्यातील उद्योजकांना त्यांच्या नाविन्यपूर्ण संकल्पनेचे बौद्धिक संपदा हक्क सुरक्षित ठेवणे तसेच त्यांच्या उत्पादन किंवा सेवांचे गुणवत्ता परीक्षण आणि प्रमाणित करणे महत्वाचे असते. स्टार्टअप्सने केलेल्या नाविन्यपूर्ण संकल्पना सुरक्षित व सक्षम ठेवण्याकरिता व गुणवत्ता परीक्षण आणि प्रमाणित करण्यासाठी येणाऱ्या खर्चाकरिता नाविन्यता सोसायटीकडून अर्थसहाय्य करण्याचे उपक्रम ही हाती घेण्यात आले आहेत.

सन २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राच्या लोकसंख्येपैकी ४८% महिला असून, देशातील एकूण उद्योजकांपैकी फक्त १४% महिला उद्योजक आहेत. महिलांचे हे प्रमाण व क्षमता विचारात घेता, स्टार्टअप आणि उद्योजकता क्षेत्रात महिलांचे प्रतिनिधित्व वाढावे याकरिता नाविन्यता संस्थेमार्फत महिलांकरिता विविध उपक्रम राबविले जातात. ग्रामीण भागातील महिलांना प्रोत्साहित करण्याकरिता "हिरकणी नवउद्योजक महाराष्ट्राची" हा उपक्रम २०१८ मध्ये राबविण्यात आला होता. महिला उद्योजकता क्षेत्रात विशेष उपक्रम राबवून त्यास अधिक व्यापक स्वरुप देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

स्टार्टअप व उद्योजकता क्षेत्रात महिलांचे प्रतिनिधित्व वाढावे, तसेच महिलांना उद्योजक होण्यास आवश्यक ते सहकार्य मिळावे, याकरिता महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी अंतर्गत महिलांकरिता "महिला उद्योजकता कक्ष" स्थापन करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी अंतर्गत स्थापन करण्यात यावयाच्या महिला उद्योजकता कक्षाची रचना पुढीलप्रमाणे राहील:-

१) मुख्य कार्यकारी अधिकारी - अध्यक्ष
२) उपमुख्य कार्यकारी अधिकारी -सदस्य
३) मा. अध्यक्षांनी नामनिर्देशित सोसायटीतील २ महिला कर्मचारी- सदस्य
४) UN Women चे प्रतिनिधी- सदस्य

**महिला उद्योजकता कक्षाच्या भूमिका व जबाबदाऱ्या पुढील प्रमाणे राहतील. :-**

१) " महिला उद्योजकता " या करिता विविध शासकीय विभाग आणि नामांकित संस्थांशी समन्वय साधणे.

२) स्टार्टअप्स, उद्योजकतेमध्ये महिलांचे प्रमाण वाढावे याकरिता लक्ष्य निर्धारित करुन आराखडा तयार करणे.

३) महिला उद्योजकता वाढविण्याकरिता आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय स्तरावरील नामांकित संस्था व कौशल्य मंडळाशी समन्वय करुन, परिपूर्ण प्रशिक्षणाचे वर्ग आयोजित करणे.

४) कक्षातर्फे करण्यात येणाऱ्या कार्यवाहीचा त्रैमासिक प्रगती अहवाल कार्यकारी संनियंत्रण समितीसमोर सादर करणे.

महिला उद्योजकता कक्षातर्फे सुरु करण्यात येणाऱ्या उपक्रमांना सन २०२०-२०२१ मध्ये राज्य नाविन्यता सोसायटीकडे उपलब्ध निधीतून खर्च करण्याची अनुमती राहील. तसेच महिला केंद्रीत उपक्रमांकरिता / उद्योजकता व नाविन्यपूर्ण उपक्रमांकरिता राखून ठेवण्यात आलेल्या इतर विभागांच्या / जिल्हयांच्या निधीतूनही सदर उपक्रम राबविण्यात येऊ शकतात.

सन २०२१-२०२२ पासून महाराष्ट्र राज्य नाविन्यता संस्थेने अर्थसंकल्पात होणाऱ्या तरतूदीपैकी कमाल ३०% निधी या कक्षातर्फे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांकरिता राखून ठेवतील.

<u>कक्षातर्फे राबविण्यात येणारे उपक्रम पुढील प्रमाणे असतील</u>.:-

१) <u>नाविन्यता व उद्योजकता प्रशिक्षण</u>:-

अ) नाविन्यता व उद्योजकता क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी विशिष्ट कौशल्य व प्रशिक्षणांची आवश्यकता असते, या कक्षामार्फत इतर शासकीय विभागांच्या व नामांकित संस्थांच्या भागिदारीने महिला उद्योजकांच्या आवश्यकतेनुसार विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येईल.

ब) ग्रामीण भागातील महिलांना योग्य संधी, मार्गदर्शन इत्यांदीच्या अभावांमुळे नाविन्यतेस प्रोत्साहित करण्यासाठी अनेक आव्हाने आहेत आणि यावर मात करण्याकरिता ग्रामीण महिला उद्योजकांसाठी विशेष उपक्रम/योजनांचे आयोजन कक्षामार्फत करण्यात येईल. या अंतर्गत महिला बचत गटांना/उद्योजकांना समर्थन देण्यासाठी " हिरकणी नवउद्योजक महाराष्ट्राची" सारखे उपक्रम राबविले जातील. या उपक्रमांतर्गत स्वव्यवस्थापन, आर्थिक व डिजीटल साक्षरता, व्यवसाय नियोजन व विकास, लोकसंचालित प्रशिक्षण इत्यादींचा समावेश असेल. या उपक्रमांमध्ये आवश्यक ते सुधारणा करण्याचे अधिकार समितीस राहतील.

२) **इनक्यूबेशन व एक्सलरेशन :-**

अ) महिला उद्योजकांसाठी नविन इनक्यूबेटर्स स्थापित करणे, विद्यमान इनक्यूबेटर्समार्फत महिला उद्योजकांसाठी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करणे, मार्गदर्शन करणे इ. वर कक्ष लक्ष केंद्रित करेल.

ब) महिला उद्योजकांच्या चालविण्यात येणाऱ्या विकसित स्टार्टअप्सच्या विस्तृतीकरणासाठी व त्यांच्या उद्योगास गती देण्यासाठी एक्सलरेटर उपक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. या कक्षामार्फत विविध एक्सलरेटर कार्यक्रम राबविण्यात येतील.

३) <u>अर्थसहाय्य</u>:-

महिलांचे नेतृत्व असलेल्या स्टार्टअप्सना प्रारंभिक टप्प्यात अर्थसहाय्य करणे, विकसित स्टार्टअप्सना अधिकृत निधीकरिता स्टार्टअप परिसंस्थेतील गुंतवणुकदारांशी समन्वय साधून देणे, संशोधन व विकास क्षेत्रात, तांत्रिक उद्योजकता क्षेत्रात करिअर करु इच्छिणाऱ्या महिलांना विशेष अनुदान पुरविणे इ. करिता कक्षामार्फत विविध उपक्रम व योजना राबविण्यात येतील. याचबरोबर आर्थिक मदत करणाऱ्या शासनाच्या विविध योजनांची (उदा. मुद्रा, स्फूर्ति इ) माहिती महिला उद्योजकांपर्यंत पोहोचविण्यासाठी कक्षामार्फत उपाययोजना करण्यात येतील.

४) **भागीदारी:-**

महिला उद्योजकतेला प्रोत्साहन देण्याकरिता राष्ट्रीय / आंतराष्ट्रीय, शासकीय /खाजगी संस्थांबरोबर महिला उद्योजकता कक्ष भागीदारी करेल याअंतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान, NASSCOM, CII, FICCI, ASSOCHAM इ. सारख्या संस्थांचा समावेश असेल. अशा भागिदारीतून महिला उद्योजकांना आवश्यक अशा सर्व सेवा-सुविधा पुरविण्यासाठी कक्ष सक्रियपणे कार्य करेल.

५) **विद्यार्थिनींदशेतच उद्योजकतेचे प्रशिक्षण:-**

महिला उद्योजकता कक्षातर्फे विद्यार्थिनींदशेतच उद्योजकता विकसित होण्यासाठी विद्यार्थीनीसाठी विद्यापीठ/महाविद्यालयात विशेषत: महिला महाविद्यालयात "उद्योजकता क्लब" स्थापित करेल. अशा विद्यापीठ स्तरावर व आंतर विद्यापीठ/ महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थीनी उद्योजकता क्लबच्या आंतरक्रिया घडून यणेस्तव परिसंवाद, प्रशिक्षण, अभ्यासदौरा, मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात येईल.

महाविद्यालयातील "विद्यार्थीनी उद्योजकता क्लब" सदस्यांना प्रेरित करणे, मार्गदर्शन करणे यासाठी विद्यापीठ स्तरावर ज्याप्रमाणे गांधी विचारधारा केंद्र, ग्रामीण अध्ययन केंद्र, महिला विकास कक्ष कार्यरत असतात त्याचप्रमाणे विद्यार्थीनी उद्योजकता केंद्र स्थापित करण्यात येईल.

२. सदर प्रयोजनासाठी सचिव, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे कार्यकारी व संनियंत्रण समिती गठीत करण्यात येईल.

| अ.क्र. | अधिकारी | पद |
|---|---|---|
| १ | सचिव, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग | अध्यक्ष |
| २ | सचिव, महिला व बाल विकास विभाग | सदस्य |
| ३ | सचिव,उद्योग, उर्जा व कामगार विभाग | सदस्य |
| ४ | सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग | सदस्य |
| ५ | विकास आयुक्त, उद्योग | सदस्य |
| ६ | व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ (MAVIM) | सदस्य |
| ७ | मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोत्ती अभियान (MSRLM) | सदस्य |
| ८ | कुलगुरु , एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई | सदस्य |
| ९ | आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय (NULM) | सदस्य |
| १० | महिलांच्या क्षेत्रात काम करणारे नामांकित संस्थाचे प्रतिनिधी (दोन) | सदस्य |
| ११ | UNDP चे प्रतिनिधी | सदस्य |
| १२ | UN Women चे प्रतिनिधी | सदस्य |
| १३ | UNICEF चे प्रतिनिधी | सदस्य |
| १४ | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता संस्था | सदस्य सचिव |

समितीची बैठक तीन महिन्यातून एकदा होईल. तसेच बैठकीस आवश्यकता असल्यास तज्ञ / अधिकारी यांना बैठकीसाठी निमंत्रित करण्याचे अधिकार समितीचे अध्यक्ष यांना राहतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०२१०१०४१५५५१६९२०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Anshu Sinha
Date: 2021.01.04 16:00:26 +05'30'

(अन्शु सिन्हा)

सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
१) मा. राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलगुरु यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
३)मा.मंत्री, कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता विभाग, यांचे खाजगी सचिव.
४) मा. राज्यमंत्री, कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता विभाग, यांचे खाजगी सचिव
५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन , मंत्रालय,मुंबई
६) मा. विरोधी पक्षनेता, विधान सभा/विधान परिषद. विधान मंडळ, मुंबई.
७) सर्व विधान सभा/विधान परिषद सदस्य, विधान मंडळ, मुंबई
८) मा.अपर मुख्य सचिव महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
९)मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
११)सचिव, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) सर्व सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई
१३) सर्व विद्यापीठांचे कुलगुरु
१४) संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई
१५) संचालक, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे/मुंबई
१६) आयुक्त, कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता आयुक्तालय,नवी मुंबई
१७) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई
१८) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, मुंबई
१९) महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीचे सर्वसाधारण मंडळ व नियामक परिषदेचे सर्व सदस्य
२०) निवड नस्ती / उद्योजकता